# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** गोंदिया **P.S.(ठाणे):** देवरी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0085 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 14/02/2026 07:24

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 13/02/2026
**Time Period (कालावधी):** पहर 7 **Date To ( दिनांक पर्यंत):** 13/02/2026
**Time From (वेळेपासून):** 19:12 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 20:04 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 14/02/2026 **Time (वेळ):** 07:24 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 013

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 14/02/2026 07:24 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसील कार्यालय देवरी, देवरी,देवरी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): उमाकांत गोवर्धन उगले
(b) **Father's Name** (वडील चे नाव) : गोवर्धन उगले
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1975
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ,गोंदिया,गोंदिया,देवरी,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ,गोंदिया,गोंदिया,देवरी,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय): नोकरी
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.): 91-9664959090

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री संदेश नैनदास बोरकर | | वडील का नाम : नैनदास बोरकर | 1. ठाणा ,आमगाव,आमगांव, गोंदिया,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

फिर्यादीने लाचलुचपत कार्यवाही करून लेखी रिपोर्ट दिल्यावर आरोपीविरूध्द तात्काळ गुन्हा दाखल केले

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | ध्वनी उपकरणे | 03 संन्डीक्स कंपनीचे 32 जी.बी. क्षमतेचा मेमोरी कार्ड | 0.00 |

| **S.No. (अ.क्र.)** | **Property Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (वर्णन)** | **Value(In Rs/-) (मुल्य (रू.** |
|---|---|---|---|---|
| 2 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | एक पोको कंपनीचा जुना वापरता मोबाईल फोन | 5,000.00 |
| 3 | कागदपत्रे आणि मुल्यवान रोखे | किरकोळ कागदपत्र | जप्त कागदपत्रे | 0.00 |
| 4 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | पाचशे रूपये दराचे 3 भारतीय चलनी नोटा | 1,500.00 |
| 5 | इतर | घरगुती वस्तु | 1 राखाडी रंगाचा जुना वापरता फुलफॅन्ट | 0.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

6,500.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)** |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

दिनांकः- 14.02.2026

नांवः- उमाकांत गोवर्धन उगले, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया
मो. क्र. 9664959090.

आम्ही दिनांक 13.02.2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया कार्यालयात हजर राहुन कार्यालयीन कामे करीत असतांना वेळ 11.30 वा. तक्रारदार यांनी कार्यालयात येवुन लाच मागणी संबंधाने तक्रार द्यावयाची आहे असे सांगीतल्याने त्यांना त्यांचे नाव गाव तसेच तक्रारीसंबंधाने विचारणा केली असता त्यांनी त्यांचे नाव भोजराज शामराव फुंडे वय 49 वर्ष व्यवसाय शिक्षक रा. राष्ट्रसंत कॉलोनी त्रिमुर्ती नगर देवरी असे सांगुन मौजा देवरी येथील सर्वे नंबर 309/1/ब ले आउट मध्ये असलेल्या 1189 चैरस खुल्या जागेवर सार्वजनिक गणेश व साई बहुउदेशीय संस्था देवरी यांनी अवैध बांधकाम केले आहे याबाबत मा. उच्च न्यायालय खंडपिठ नागपूर येथे दाखल केलेल्या रिट पिटीशन क्र. 7217/2025 मध्ये मा.न्यायालयाने पारीत केलेल्या आदेशात माझ्या बाजुने चौकशी अहवाल तयार करुन उपविभागीय देवरी यांना पाठविण्यास व मला देण्यासाठी तहसिल कार्यालय देवरी येथील श्री बोरकर लिपीक हे दोन हजार रुपयाची लाच मागणी करीत असल्याने त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यास तक्रार देण्यास आलो आहे असे सांगीतले. त्यावरुन त्यांना त्यांची तक्रार स्वहस्ताक्षरात लिहुन देण्यास सांगितले असता त्यांनी त्यांची तक्रार स्वहस्ताक्षरात लिहुन दिली.

सदर तक्रारीवरुन लाच मागणीची पडताळणी करुन पुढील लाचेचा सापळा कार्यवाही आयोजित करण्यासाठी मा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती गोंदिया यांना पत्र देउन दोन शासकीय पंच नामे श्री रजत पुरणसींह बैस वय-28 वर्ष पद- स्थापत्य अभियांत्रीकी सहायक श्री स्वप्नील राजेन्द्र सोनले वय 28 वर्ष, पद- स्थापत्य अभियांत्रीकी सहायक, बांधकाम विभाग, पंचायत समिती गोंदिया यांना उपलब्ध करुन घेतले.

त्यानंतर दोन्ही पंचाना तक्रारदार यांनी एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणी संबंधी तक्रार नोंदविलेली असुन त्या तक्रारीनुसार नमूद लोकसेवकाने तक्रारदाराकडे लाचेची मागणी केल्यास व लाच मागणीबाबत योग्य पडताळणी झाल्यास त्यांचेविरूध्द लाचेचा सापळा आयोजित करून पुढील कायदेशीर कार्यवाही करावयाची आहे असे सांगुण सदर कारवाई पंच म्हणुन काम करण्याची त्यांची संमती विचारली असता त्यांनी पंच म्हणुन काम करण्याची संमती दिली. त्यावरुन श्री. रजत पुरणसींह बैस यांना पंच क्र. 1 तर श्री स्वप्नील राजेन्द्र सोनले यांना पंच

क्र. 2 म्हणुन नेमण्याचे ठरविण्यात आले.

सापळा पार्टीतील सदस्य पोलीस निरीक्षक अरविंद राउत, स.फौ. चंद्रकात करपे, पो.हवा. संजयकुमार बोहरे, मंगेश काहालकर, नापोशि. संतोष शेंडे, संतोष बोपचे, प्रशांत सोनवाने, अशोक कापसे, मनापोशि संगीता पटले सर्व ला.प्र.वि. कार्यालय गोंदिया व चालक पो.हवा.सोमेश्वर इंदुरकर, मोपवि.पो.मु.गोंदिया तसेच तक्रारदार यांचा नमुद दोन्ही पंचांना परिचय करून देवुन यांचीच एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणीसंबंधी तक्रार असल्याचे पंचांना सांगीतले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांनी स्वहस्ताक्षरात लिहुन दिलेली तक्रार दोन्ही पंचांना वाचावयास दिली. ती तक्रार दोन्ही पंचांनी वाचली. त्यानंतर आमचे सुचनेप्रमाणे दोन्ही पंचांनी तक्रारदार यांना त्यांचे तक्रारीसंबंधी तोंडी विचारपुस केली. तक्रारदार यांनी नोंदविलेली तक्रार व त्यांनी तक्रारीसंबंधी तोंडी कथन केलेला मजकूर सारखाच असल्याची दोन्ही पंचांची खात्री झाल्यानंतर दोन्ही पंचांनी तक्रारीवर सह्या केल्या व त्यानंतर आम्ही त्या तक्रारीवर सही केली. तक्रारदार यांनी नोंदविलेल्या तक्रारीतील मजकुर खालीलप्रमाणे आहे.

तक्रार

दिनांक 13.02.2026

प्रति,

मा. पोलीस उपअधिक्षक

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया.

विषयः- मा. उच्च न्यायालय खंडपिठ नागपूर रिट पिटीशन 7217/2025 मध्ये केलेल्या आदेशात माझ्या बाजुने चौकशी अहवाल तयार करुन पाठविण्यासाठी दोन हजार रुपयाची लाच मागणारे श्री बोरकर लिपीक तहसिल कार्यालय देवरी यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याबाबत

तक्रारदारः- भोजराज शामराव फुंडे वय 49 वर्ष व्यवसाय शिक्षक रा. राष्ट्रसंत कॉलोनी त्रिमुर्ती नगर देवरी मो.क्र. 7218235895, 9765165638.

मा. महोदय,

सविनय सादर की, मी वर नमुद ठिकाणी माझ्या परिवारासह राहत असुन आश्रम शाळा शेरपार येथे माध्यमीक शिक्षक म्हणुन नोकरीस आहे.

मौजा देवरी येथील सर्वे नंबर 309/1/ब मध्ये सन 2017 मध्ये प्लॉट खरेदी करुन त्या ठिकाणी घर बांधले आहे, सदर सर्वे नंबर मध्ये एकुण अंदाजे 67 प्लॉट असुन जवळपास तिस लोकांनी घर बांधुन रहात आहेत. सदर सोसायटी अंतर्गत 1189 चैरस मीटर खुली जागा ले आउट नुसार ठेवण्यात आली आहे. सदर खुल्या जागेवर सार्वजनिक गणेश व साई बहुउदेशीय संस्था देवरी यांनी अवैध बांधकाम केले आहे. सदर बांधकामावर कारवाई करुन काढण्यासाठी मी इतर लोकांनी नगर पंचायत देवरी, मंडळ अधिकारी देवरी यांना पत्रव्यवहार करुन सुध्दा कायदेशीर कारवाई न झाल्यामुळे मी व रहिवाशी यांनी मा. उच्च न्यायालय खंडपिठ नागपूर येथे रिट पिटीशन 7217/2025 अन्वये अर्ज दाखल केला असता दि. 27.11.2025 रोजी माननिय न्यायालयाने सदर अर्जामध्ये योग्य कारवाई करण्याचे आदेश मुख्याधिकारी नगर पंचायत देवरी यांना दिले आहेत. त्या अनुषंगाने मी उपविभागीय अधिकारी देवरी यांना माननिय न्यायालयचे आदेशाप्रमाणे कारवाई करण्याबाबत दि. 08.12.2025 रोजी अर्ज केला असता उप विभागीय अधिकारी देवरी यांनी तहसिलदार देवरी यांना सदर प्रकरणात सविस्तर चौकशी/तपासणी करुन आवेदकास परस्पर कळविण्याबाबत व वस्तुनिष्ठ अनुपालन अहवाल सादर करण्याबाबत दि. 18.12.2025 रोजी कळवले.त्याची एक प्रत मला दिली असता, सदर प्रकरणात चौकशी अहवाल तयार झाला किंवा नाही याबाबत विचारणा करण्यासाठी तहसिल कार्यालय देवरी येथे दि. 12.02.2026 रोजी मी गेलो असता तेथे मला श्री. बोरकर लिपिक भेटले त्यांना मी मला प्रतिलिपी केलेल्या अर्जाची प्रत दाखवुन चौकशी अहवाल तयार झाला किंवा नाही याबाबत विचारणा केली असता त्यांनी मला तुमच्या बाजुने अहवाल तयार करुन देण्यासाठी दोन हजार रुपये द्यावे लागतील असे सांगीतले. तेव्हा मी नाईलाजाने होकार देवुन परत आलो.

दि. 13.02.2026 रोजी श्री. बोरकर यांनी मला फोन करुन पंचशील चैक विठ्ठल मंदिर समोर बोलावुन सायंकाळपर्यंत अहवाल तयार करुन ठेवतो. सायंकाळी दोन हजार रुपये घेवुन या आपण हॉटेलमध्ये भेटु असे बोलले. तेव्हा मी होकार देवुन परत आलो.

माननिय उच्च न्यायालय खंडपिठ नागपूर यांनी रिट पिटीशन क्रमांक 7217/2025 मध्ये केलेल्या आदेशात माझ्या बाजुने चौकशी अहवाल तयार करुन उपविभागीय अधिकारी देवरी यांना व मला देण्यासाठी श्री बोरकर लिपिक तहसिल कार्यालय देवरी मागत असलेले दोन हजार रुपये ही कायदेशीर फिस नसुन ती लाच रक्कम असल्याची माझी खात्री झाली आहे. ती लाच देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया येथे येवुन तक्रार देत आहे.

तरी, श्री. बोरकर लिपिक तहसिल कार्यालय देवरी यांच्यावर कायदेशीर कारवाही करणेस विनंती आहे. श्री. बोरकर यांच्या बरोबर माझे कुठलेही आर्थिक देवाण-घेवाण अथवा वैरभाव नाही.

त्यानंतर तक्रारदार यांनी गै.अ. यांना लाचेमध्ये देण्याकरीता स्वतःच्या बचतीतुन त्यांच्याकडे जमा असलेल्या रू. 500/- दराचे 04 चलनी नोटा असे एकुण रू. 2000/- जमा केले होते त्या नोटांचे क्रमांक आमचे सुचनेवरुन पंच क्र. 1 यांनी वाचले व पंच क्र. 2 यांनी पडताळुन पाहिल्यानंतर रू. 500/- दराचे 04 भारतीय चलनी नोटांची वेगळी यादी तयार करण्यात आली.

त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना व तक्रारदार यांना लाचेच्या सापळा कार्यवाही करीता उपयोगात येणाऱ्या अँथ्रॉसीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा उपयोग व त्यांचे वैशिष्टे समजावून सांगुण अधिनस्त अंमलदार यांचे करवी प्रात्यक्षिक करुन दाखविला.

तक्रारदार यांनी नोंदविलेल्या तक्रारी नुसार गै.अ. बोरकर लिपिक, तहसिल कार्यालय देवरी यांची तक्रारदाराकडे खरोखरच लाचेची मागणी आहे काय? याबाबत पंचाचे उपस्थितीत कार्यालयीन व्हॉईस रेकार्डरद्वारे लाच मागणीची पडताळणी करुन लाच मागणीची योग्य पडताळणी झाल्यास पुढील सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले.

गैरअर्जदार यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली किंवा कसे? याबाबत तक्रारदार व पंच क्र 1 यांना गैरअर्जदार यांचेकडे पाठवुन तक्रारदार व गैरअर्जदार यांच्यात होणारे संभाषण व्हाईस रेकॉर्डरद्वारे मेमरी कार्ड मध्ये रेकॉर्ड करणे असल्याने आमचे सुचनेवरुन नापोशि. प्रशांत सोनवाने यांनी तक्रारदार तसेच दोन्ही पंचांना कार्यालयातील "सोनी" कंपनीचे ICD-PX 470 डिजीटल व्हाईस रेकॉर्डर तसेच सॅनडिस्क कंपनीचे नविन मेमरी कार्ड काढुन दाखविले. व्हाईस रेकार्डर मध्ये नविन सेल टाकुन व्हाईस रेकार्डर सुरु करुन त्यात कोणत्याही प्रकारची व्हाईस रेकॉर्ड फाईल नसल्याची पंचानी व आम्ही खात्री केली. त्यानंतर प्लास्टीक आवरणात बंद असलेले 32 जिबी क्षमतेचे सॅनडिस्क मायक्रो एसडी असे छापील नाव असलेले व सिरीयल क्र. 5172XV301A0Eअसलेला एक नविन मेमरी कार्ड पंचासमक्ष काढुन सदर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये टाकले. व्हाईस रेकार्डर दोन्ही पंचाना दाखवुन व्हाईस रेकार्डरचे इंटरनल मेमरी आणि मेमरी कार्डमध्ये कोणत्याच प्रकारची पुर्वीची व्हाईस रेकार्डीग फाईल नसल्याबाबत दोन्ही पंचानी व आम्ही खात्री केली. सदर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यामध्ये तक्रारदार व गैरअर्जदार यांचे आवाज कशा पध्दतीने रेकार्ड करण्यात येते, व्हाईस रेकार्डर कशा पध्दतीने बंद करण्यात येतो याबाबत तक्रारदार व दोन्ही पंचाना समजावुन सांगण्यात आले. त्यानंतर व्हाईस रेकार्डरच्या सहाय्याने मेमरीकार्ड व व्हाईस रेकार्डर फॉर्मेट करुन पंचानी मेमरीकार्ड व व्हाईस रेकार्डरचे इंटरनल मेमरीकार्ड मध्ये कोणत्याही प्रकारची रेकॉर्ड फाईल नसल्याची खात्री केल्यानंतर सदर व्हाईस रेकार्डर बंद करुन सुस्थितीत करुन ट्रॅप सुटकेसमध्ये ठेवले.

त्यानंतर तक्रारदार यांना पंचासमक्ष गै.अ. हे कोठे मिळतील म्हणुन विचारणा केली असता गै.अ. यांनी आज रोजी संध्याकाळी तहसिल कार्यालयाजवळील हॉटेलात भेटणार असल्याचे सांगीतले त्यावरुन सदर गै.अ. यांचे विरुध्दची लाच मागणी पडताळणी कार्यवाही आजच संध्याकाळी तहसिल कार्यालयाजवळ देवरी येथे जावुन करण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर आमच्या सुचनेवरुन ना.पो.षि. प्रषांत सोनवाने यांनी सापळा कार्यवाही साठी लागणारे सर्व साहीत्य (डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, नविन मेमरी कार्ड, अल्ट्राव्हायलेट लॅम्प, अॅन्थ्रासीन पावडरचा सिलबंद डब्बा, काळा कपडा, मेणबत्ती, माचिस, सिल करण्याचे साहित्य, मोजमाप करण्याचा टेप, कापडी पिशवी आणि पाण्याने भरलेली मोठी बाटली, साबुन, इत्यादी) ट्रॅप सुटकेस, लॅपटॉप, प्रिंटर हे विजजोडणीचे उपकरणासह असे संपुर्ण साहित्य शासकीय वाहन क्र. एम.एच.35/ए डब्ल्यु- 486 मध्ये ठेवले.

त्यानंतर तक्रारदार यांना वेळ 16.00 वा. त्यांचेकडील दुचाकी वाहन क्र. एम.एच.35/बी 2992 ने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया येथुन देवरी येथे जाणेस रवाना करुन आमगाव देवरी रोडवरील मौजा भागी जवळील चौरागडे फॉर्म हाउसचे जवळ 18.30 वा पर्यंत पोहचण्याच्या सुचना देवुन रवाना केले. त्यानंतर आम्ही, दोन्ही पंच व सापळा पार्टीतील पो.हवा. मंगेश काहालकर, संतोष बोपचे, नापोशि. प्रशांत सोनवाने व चा.पो.हवा. इंदुरकर असे शासकिय वाहनाने आणि पोलीस निरीक्षक अरविंद राउत, स.फौ. चंद्रकांत करपे, पो.हवा. संजयकुमार बोहरे, नापोशि. अशोक कापसे, संतोष शेंडे हे खाजगी चारचाकी वाहनाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया

येथुन मौजा भागी, चैरागडे फॉर्म हाउसचे जवळ जाण्याकरीता रवाना होवुन वेळ 18.30 वा. पोहचलो असता तिथे तक्रारदार हे दिसुन न आल्याने आम्ही कार्यालयीन मो.क्र.9209041064 वरुन तक्रारदार यांचे मोबाईल क्र. 9765165638 वर काल करुन चौरागडे फॉर्मजवळ येण्यास सांगुन आम्ही आलो असल्याचे सांगीतले. त्यावरुन ते थोडयाच वेळात आपले मोटारसायकलने तिथे हजर आले. आम्ही सर्वांनी आपआपले वाहन कोणाचेही नजरेस पडणार नाहीत अशाप्रकारे नजरेआड आडोशाला ठेवुन व त्याच ठिकाणी बसुन पुढील कार्यवाही करण्याचे ठरविले. तक्रारदार यांनी दोन्ही पंचासमक्ष सांगीतले की, त्यांचे मोबाईलचे व्हॉट्सअपवर गै.अ.यांनी त्यांचे मोबाईल क्र. 9158571945 वरुन वेळ 18.50 वा. खाली असाल तर ऑफिसकडे या असा मॅसेज पाठविल्याने मी त्यांना ओके म्हणुन रिप्लाय दिला असल्याचे सांगीतले. त्यावरुन गै.अ.यांची लाच मागणी पडताळणी तहसिल कार्यालय देवरी येथे तक्रारदार यांना पंच क्र.1 सह पाठवुन करण्याचे सर्वानुमते ठरविले.

त्यानंतर तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा कार्यवाहीतील सदस्याना लाच मागणी पडताळणी वेळी घेण्यात येणाऱ्या दक्षतेबाबत सुचना समजावुन सांगीतल्या. त्यानंतर पंच क्रमांक 1 यांना तक्रारदार यांची अंगझडती घेण्यास सांगीतले त्यावरुन पंच क्र. 1 यांनी तक्रारदार यांची अंगझडती घेतली.

त्यानंतर आमचे सुचनेवरुन नापोशि प्रशांत सोनवाने यांनी ट्रॅप सुटेकस मधुन सुस्थितीत करुन ठेवुन असलेले सोनी कंपनीचे ICD-PX 470 कार्यालयीन डिजीटल व्हॉईस बाहेर काढले व वेळ 19.12 वाजता सुरु करुन पंच क्र. 1 व तक्रारदार यांचे आवाजात लाच मागणी पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याबाबतचे संभाषण ध्वनिमुद्रित करून ते व्हॉईस रेकॉर्डर कापडी पिशवित ठेवुन तक्रारदार यांचे गळयामध्ये शर्टचे आत दोरीने लटकवुन दिले.

त्यानंतर तक्रारदार यांना त्यांचे मोटारसायकलने पंच क्र. 1 यांचेसह आम्ही थांबुन असलेल्या ठिकाणाहुन तहसिल कार्यालय देवरी येथे लाच मागणी संबधाने बोलणी करण्याकरीता पाठविण्यात आले. आम्ही, पंच क्र. 2 व सापळा पार्टीतील सर्व सदस्य त्याच ठिकाणी थांबुन राहीलो.

तक्रारदार हे गै.अ.यांचेशी बोलणी करून पंच क्र. 1 यांचेसह आम्ही थांबुन असलेल्या ठिकाणी परत आले. आमचे सुचनेवरुन नापोषि प्रषांत सोनवाने यांनी तक्रारदार यांचे गळयात असलेले व्हॉईस रेकार्डर बाहेर काढुन पंच क्र. 1 यांचे आवाजात वेळ 19.31 वाजता बंद केले. व्हॉईस रेकॉर्डरच्या मेमोरी कार्ड मधील PRIVATE /SONY/REC-FILE/FOLDER-1 मध्ये फाईल 260213-1912mp3 रेकॉर्ड झाल्याचे दिसुन आले.

त्यानंतर आम्ही पंच क्र. 1 यांना घडलेली हकीकत कथन करण्यास सांगीतले असता पंच क्र. 1 यांनी सांगीतले की, "मी, तक्रारदार यांचेसह गै.अ. यांचेशी लाच मागणी संबंधाने बोलणी करण्यास तहसिल कार्यालय देवरी येथे त्यांचे कक्षामध्ये गेलो असता तिथे एकच इसम बसुन आपले काम करीत होते व त्यांचे टेबलवर श्री संदेश एन. बोरकर, सहायक महसुल अधिकारी-प्रस्तुतकार-1 अशा नावाची पाटी ठेवुन असल्याचे दिसुन आल्याने तेच गै.अ. बोरकर लिपिक असल्याची माझी खात्री झाली. त्यांना पाहुन तक्रारदार यांनी नमस्कार साहेब असे म्हणुन माझा भाचा अनिकेत आहे कार्यक्रमात आला आहे असे सांगुन माझा त्यांचेशी परिचय करुन दिला. त्यानंतर त्यांच्यात त्यांचे कामासाबंधी चर्चा होवुन गै.अ. यांनी तक्रारदार यांना झाला ते ई ऑफीसला टाकलो मी, सोमवार पर्यंत होवून जाईल साहेब, प्रतिलिपी मध्ये मुख्याधिकारीले देवुन मा. कोर्टाचे जे आदेश आहे त्यानुसार नियमानुसार कार्यवाही करुन तसा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा असा अहवाल तयार केल्याचे सांगीतले. त्यावर तक्रारदार यांनी गै.अ. यांना ते किती म्हणल्या होत्या असे विचारल्यावर गै.अ. यांनी दोन म्हटलो होतो पण पाचसौ कमी दयाल असे म्हटले तेव्हा तक्रारदार यांनी तुम्ही मगाशी दोन म्हणल्या तं दोन सौच समजलो असे म्हटले त्यावर गै.अ. यांनी नाहीजी दोन हजार म्हटलो होतो परंतु पाचसौ कमी दयाल असे तक्रारदार यांना सांगीतले. त्यानंतर त्यांच्यात पुन्हा कामासंबंधी चर्चा होवुन तक्रारदार यांनी त्यांना दिलेल्या सुचनानुसार आपले पॅन्टच्या खिशातील पॉकिट पाहुन त्यामध्ये पैसे दिसुन न आल्याने पत्नीस फोन लावुन तिच्याशी बोलणी केली तेव्हा गै.अ. यांनी तक्रारदार यांना जावुन या, हे काम कम्प्लीट करना आहे, एक तास पुन्हा लागेल, एक तासापर्यंत आहो मी येथे असे सांगीतल्याने तक्रारदार यांनी त्यांना ठिक आहे ना सर असे म्हणुन तिथुन निघुन परत आलो असे पंच क्र. 1 यांनी सांगितलेल्या हकीकतीस तक्रारदार यांनीही दुजोरा दिला.

त्यानंतर आम्ही लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरच्या मेमरी कार्डच्या PRIVATE /SONY/REC-FILE/FOLDER-1 मध्ये 260213-1912 mp3 मध्ये तक्रारदार व गै. अ. यांच्यातील रेकॉर्ड झालेले संभाषण दोन्ही पंचासमक्ष ऐकले व दोन्ही पंचांना ऐकविले. पंच क्र. 1 यांनी सांगितलेली हकीकत व त्यास तक्रारदार यांनी दिलेल्या दुजोऱ्यावरुन तसेच तक्रारदार व गै.अ यांच्यात झालेल्या संभाषणावरुन गै.अ. यांनी मा. उच्च न्यायालय खंडपिठ नागपूर येथे दाखल रिट पिटीशन क्र. 7217/2025 मध्ये

मा.न्यायालयाने पारीत केलेल्या आदेशानुसार तक्रारदार यांचे बाजुने चौकशी अहवाल तयार करुन मा.उपविभागीय अधिकारी देवरी यांचेकडे पाठविण्यास व तक्रारदार यांना देण्यासाठी रु.2000/- लाच रक्कमेची पंचासमक्ष मागणी करुन तडजोडीअंती रु.1500/- लाच रक्कमेची मागणी करुन ती लाच रक्कम प्राप्त करण्याचा प्रयत्न केल्याची आमची व दोन्ही पंचाची खात्री झाली. त्यावरुन गै.अ. यांचेविरुध्दची सापळा कार्यवाही तहसिल कार्यालय देवरी येथे करण्याचे सर्वानुमते ठरविले.

लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान गै.अ. यांनी तक्रारदार यांचेकडे मा. उच्च न्यायालय खंडपिठ नागपूर येथे दाखल रिट पिटीशन क्र. 7217/2025 मध्ये मा.न्यायालयाने पारीत केलेल्या आदेशानुसार तक्रारदार यांचे बाजुने चौकशी अहवाल तयार करुन मा.उपविभागीय अधिकारी देवरी यांचेकडे पाठविण्यास व तक्रारदार यांना अहवाल देण्यासाठी रु.2000/- लाच रक्कमेची पंचासमक्ष मागणी करुन तडजोडीअंती रु.1500/- लाच रक्कमेची मागणी करुन ती लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली असल्याने आमचे सुचनेवरुन पो.हवा. संतोष शेंडे यांनी ट्रॅप सुटकेस मधुन लाच रकमेचा लिफाफा बाहेर काढुन पंच क्र.2 यांचेकडे दिला. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पंच क्र.2 यांनी सदर लिफाफ्यामधुन अँथ्रासीन पावडर लावलेल्या रू. 500/- दराचे 4 चलनी नोटा असे एकुण रू. 2000/- बाहेर काढुन त्यापैकी रुपये 500/- दराची 1चलनी नोट लिफाफ्यातच ठेवुन तो लिफाफा ट्रॅप सुटकेसमध्ये ठेवुन दिला. व रु.500/- दराचे 3 नोटा तक्रारदार यांच्या फुलपँटच्या उजव्या खिश्यामध्ये अलगद ठेवुन दिल्या.

त्यानंतर आम्ही पंच क्र. 1 यांना तक्रारदार यांची अंगझडती घेण्यास सांगीतले. पंच क्र. 1 यांनी तक्रारदार यांची अंगझडती घेतली

त्यानंतर आम्ही तक्रारदार दोन्ही पंच व सापळा पथक यांना सापळा कार्यवाही दरम्यान घेण्यात येणाऱ्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्याचप्रमाणे नापोशि प्रशांत सोनवाने यांना दोन्ही पंच व तक्रारदार यांचे समक्ष सुचना दिल्या की गै.अ. यांनी तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम स्विकारल्यानंतर तक्रारदार हे गै.अ. यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजित ईशारा करतील त्यावेळेस तसेच आरोपी कडुन जप्त करण्यात येणाऱ्या कार्यवाही वेळी आपण कार्यालयीन मोबाईलमध्ये सदरचे चित्रीकरण करावे अशा सुचना देवुन त्यांचे मोबाईलमध्ये 32 जिबी क्षमतेचे सॅनडिस्क कंपनीचे ज्याचा सिरीयल क्र. 5172XV3012LW असलेला एक नविन मेमोरी कार्ड पंचासमक्ष काढुन नापोशि प्रशांत सोनवाने यांचे Realmiकंपनीचे मोबाईलमधील मेमरी कार्ड स्लॉट मध्ये Insert केले. त्यानतर मोबाईल सेटींग मध्ये जावुन सदरचे मेमरीकार्ड मध्ये पुर्वीचा कोणताही डेटा जतन नसल्याची आम्ही पंचाना खात्री करून दिली. त्यानंतर मोबाईल मधील सेटींगमध्ये जावुन फोटो व व्हिडीओ चित्रीकरण हे डायरेक्ट मोबाईलमधील मेमरी कार्डमध्ये जतन होणार असल्याचे सुनिश्चित करण्यात आले.

त्यानंतर आमचे सुचनेवरुन नापोशि प्रशांत सोनवाने यांनी सोनी कंपनीचे ICDPX470 कार्यालयीन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधुन लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान वापरण्यात आलेले मेमंरी कार्ड बाहेर काढुन त्यांचे मुळ आवरणाममध्ये ठेवुन ट्रॅप सुटकेस मध्ये सुरक्षीत ठेवुन दिले. त्यानंतर प्लॉस्टीक आवरणात बंद असलेले 32 जिबी क्षमतेचे सॅनडिस्क मायक्रो एसडी असे छापील नाव असलेले व सिरीयल क्र. 5172XV30142D असलेला एक नविन मेमोरी कार्ड पंचासमक्ष काढुन सदर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये टाकले. व्हाईस रेकार्डर तक्रारदार व दोन्ही पंचाना दाखवुन व्हाईस रेकार्डरचे इंटरनल मेमरी आणि मेमरी कार्डमध्ये कोणत्याच प्रकारची पुर्वीची व्हाईस रेकार्डींग फाईल नसल्याबाबत खात्री केली.

त्यानंतर आमचे सुचनेवरुन नापोशि प्रशांत सोनवाने यांनी वेळ 19.48 वा. व्हाईस रेकार्ड सुरु करुन त्यामध्ये तक्रारदार व पंच क्र. 1 यांचे आवाजात लाच रक्कम देण्याकरीता गै.अ. यांचेकडे जात असल्याचे संभाषण ध्वनिमुद्रित करून ते व्हाईस रेकॉर्डर कापडी पिशवित ठेवुन तक्रारदार यांचे गळयात दोरीचे सहायाने शर्टचे आत लटकवुन तक्रारदार व पंच क्र. 1 यांना आम्ही थांबुन असलेल्या ठिकाणाहुन तक्रारदार यांचे खाजगी मोटारसायकलने गै.अ. यांना लाच रक्कम देण्याकरीता तहसिल कार्यालय देवरी येथे रवाना केले. त्यानंतर आम्ही, पंच क्र. 2, पो. हवा.मंगेश काहालकर, नापोषि संतोष बोपचे, प्रशांत सोनवाने व चापोहवा सोमेश्वर इंदुरकर हे शासकीय वाहन क्र. एम.एच.35/एडब्लु-0486 ने तर पोनि अरविंद राऊत, स.फौ.चंद्रकांत करपे, पो.हवा.संजयकुमार बोहरे, नापोशि. संतोष शेंडे, अशोक कापसे हे खाजगी चारचाकी वाहनाने तहसिल अधिकारी कार्यालय देवरी येथे जाण्यास रवाना झालो. आम्ही सर्व तहसिल कार्यालय देवरी जवळ पोहचुन आप-आपले वाहन कोणालाही संशय येणार नाही अशा स्थितीत उभे करुन व तिथेच थांबुन तक्रारदार यांचे नियोजीत ईशाऱ्याची वाट पाहत बसलो. थोडया वेळाने तक्रारदार हे पंच क्र.1 व एका इसमासोबत तहसिल कार्यालयाचे बाहेर पोर्चमध्ये येवुन तक्रारदार यांनी आपल्या डोक्यावरील कानटोपी काढुन हातात ठेवुन त्यांचे सोबत बाहेर आलेल्या इसमाकडे बोट दाखवुन गै.अ. यांनी त्यांचेकडुन लाचेची रक्कम स्वीकारल्याचा नियोजित ईशारा केला. तक्रारदाराने केलेला नियोजित ईशारा पाहुन आम्ही, सापळा पार्टीतील

सर्व सदस्य पंच क्र. 2 यांचेसह तक्रारदार व पंच क्र. 1 यांचे जवळ पोहचुन गै.अ.यांना पकडुन त्यांना आपला परिचय दिला असता त्यांनी आमचा प्रतिकार करुन पळण्याचा प्रयत्न केल्याने सापळा पथकाचे सहाय्याने ताब्यात घेवुन तहसिल कार्यालयातील नायब तहसिलदार पाटी लिहलेल्या कक्षामध्ये नेवुन त्यांना शांत बसण्यास सांगुन सहकार्य करण्यास सांगीतले. तक्रारदार यांना त्या ठिकाणाहुन थोडया अंतरावर जावुन थांबण्यास सांगितले.

त्यानंतर आम्ही पंच क्र. 1 यांना तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम कोणी स्विकारली व ती त्यांनी कोठे ठेवली आहे? असे विचारले असता पंच क्र. 1 यांनी सांगीतले की, तक्रारदार यांनी त्यांचे फुलपॅंटचे उजवे खिशात ठेवुन असलेली लाच रक्कम रु. 1500/- उजव्या हाताने काढुन गै.अ. बोरकर लिपिक यांचेकडे दिली असुन त्यांनी ती लाच रक्कम आपले उजवे हाताने स्विकारुन अंगात घातलेल्या फुलपॅंटचे उजव्या खिश्यात ठेवले आहे असे सांगीतले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना जवळ बोलावुन आमच्या सुचनेवरुन अधिनस्त अंमलदार यांनी तक्रारदार यांचे गळयात लटकवुन असलेले व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन त्यामध्ये पंच क्र. 1 यांचे आवाजात सापळा कार्यवाही पुर्ण झाल्याबाबत वक्तव्य ध्वनीमुद्रीत करुन व्हाईस रेकॉर्डर 20.04 वाजता बंद केले. व्हॉईस रेकॉर्डरच्या मेमोरी कार्डच्या PRIVATE /SONY/REC-FILE/FOLDER-1 मध्ये फाईल 260213-1948mp3 रेकॉर्ड झाल्याचे दिसुन आले.

त्यानंतर आम्ही लाच रक्कम स्विकारणाऱ्या इसमास त्यांचे पुर्ण नाव व पत्ता विचारला असता त्यांनी आपले नाव श्री संदेश नैनदास बोरकर वय 39 वर्ष, पद-सहायक महसुल अधिकारी-प्रस्तुतकार 1, वर्ग-3, तहसिल कार्यालय देवरी, मुळ पत्ता- मु.पो.ठाणा,ता.आमगाव जि.गोंदिया, सध्याचा पत्ता कैलाश नागरीकर यांचे घरी किरायाने, पंचशिल चैक, विठठल रुखमाई मंदीराचे मागे देवरी ता.देवरी जि.गोंदिया असे सांगीतले.

त्यानंतर आमचे सुचनेवरून अधिनस्त अंमलदार यांनी शासकीय वाहनात ठेवलेली ट्रॅप सुटकेस व साहीत्य आणले. त्यानंतर आम्ही त्यांना आम्हा सर्वांचे हात अल्ट्राव्हायलेट लॅम्पचे प्रकाशात तपासण्यास सांगितले त्यावरुन त्यांनी कक्षात सुरु असलेले विद्युत दिवे बंद करुन अल्ट्राव्हायलेट लॅम्पचे प्रकाशात आमचे, पंच व सापळा पथकातील सर्व सदस्यांचे हात तपासले असता कोणाचेही हातास कोणत्याच प्रकारची चकाकी दिसून येत नसल्याची गै.अ.यांना खात्री करुन दिली. त्यानंतर विद्युत दिवे सुरु करुन प्रकाष पुर्ववत करण्यात आला.

त्यानंतर पुन्हा कक्षातील विद्युत दिवे बंद करुन गै.अ. संदेश नैनदास बोरकर यांचे दोन्ही हात अल्ट्राव्हॉयलेट लॅम्पचे प्रकाशात तपासले असता त्यांचे उजव्या हाताचे बोटांवर, अँथ्रॉसीन पावडरची निळसर रंगाची चकाकी दिसून आली त्यानंतर कक्षतील लाईट चालु करुन प्रकाश पुर्ववत करण्यात आला.

त्यानंतर आरोपी संदेश बोरकर यांनी तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम स्विकारुन आपले पॅन्टचे खिश्यात ठेवले असल्याने आमचे सुचनेवरुन पंच क्र. 2 यांनी सदर लाच रक्कम रु.500 दराचे 3 चलनी नोटा असे एकुण रू. 1500/- आरोपीने परिधान केलेल्या फुलपॅन्टचे उजव्या खिश्यातुन बाहेर काढुन आपल्या हातात ठेवल्या. आम्ही त्यांना गै.अ. हे बसुन असलेल्या खुर्चीच्या समोरील टेबलावर एक कोरा कागद आंथरून त्यावर त्या नोटा पसरवुन ठेवण्यास सांगितले. त्यानुसार पंच क्र. 1 यांनी त्यावर त्या नोटा पसरवुन ठेवल्या.

त्यानंतर आमचे सुचने वरुन अधिनस्त अमलदार यांनी कक्षातील विद्युत दिवे बंद करुन लाच रकमेच्या नोटांना अल्ट्राव्हायलेट लॅम्पचे प्रकाशात तपासले असता सदर नोटांना दोन्ही बाजुने अँथ्रॉसीन पावडरची निळसर रंगाची चकाकी दिसून आल्याने सदर रक्कम ही लाचेची रक्कम असल्याची आमची व पंचाची खात्री झाली. त्यानंतर प्रकाश पुर्ववत करुन लाचेच्या नोटांचे क्रमांक पंच क्रमांक 2 यांना वाचण्यास सांगितले असता त्यांनी वाचून दाखविले. याबाबत आमचे सुचनेवरुन नापोशि प्रशांत सोनवाने यांनी कार्यालयीन मोबाईलमध्ये चित्रीकरण केले.

सदर नोटांचे क्रमांक पंच क्र. 2 यांनी वाचुन दाखविले व पंच क्र. 1 यांनी ते तक्रारदार यांनी लाच रक्कम जमा करतेवेळी तयार केलेल्या लाच रकमेच्या नोटांच्या यादीतील क्रमांकाशी जुळवुन पाहीले असता सापळा कार्यवाही करीता जातांना रु.500/- दराचे 03 चलनी नोटांचे क्रमांक व गै.अ. यांनी स्विकारलेल्या नोटांचे क्रमांकाशी तंतोतंत जुळुन आले. त्या नोटा एका हिरव्या रंगाच्या कागदी लिफाफ्यामध्ये ठेवुन त्या लिफाफ्यावर जप्त मुद्येमालाचे वर्णनाचे टंकलिखीत केलेला कागद चिटकवुन सदर लिफाफ्यावर आमचे, दोन्ही पंचांचे व ज्याचे पासुन जप्त केले ते आरोपी श्री संदेश नैनदास बोरकर वय 39 वर्ष, पद-सहायक महसुल अधिकारी-प्रस्तुतकार 1, वर्ग-3, तहसिल कार्यालय देवरी यांची सही घेवुन तो लिफाफा कार्यालयीन सिलने सिलबंद केला. तसेच गै.अ. यांचेकडे असलेला POCO कंपनीचा C61 मॉडेल असलेला मोबाईल एका हिरव्या रंगाच्या कागदी लिफाफ्यामध्ये ठेवुन त्या लिफाफ्यावर जप्त मुद्येमालाचे वर्णनाचे टंकलिखीत केलेला कागद चिटकवुन सदर लिफाफ्यावर आमचे, दोन्ही पंचांचे व ज्याचे पासुन जप्त केले ते आरोपी संदेश नैनदास बोरकर यांची सही घेवुन तो लिफाफा कार्यालयीन सिलने सिलबंद करुन तपासकामी जप्तीपत्रक क्र. 1 अन्वये जप्त करण्यात आला.

त्यानंतर आरोपी यांना तक्रारदार यांचे कामासंबंधीचे कागदपत्रबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांचे कपाटातुन काढुन दिल्याने कागदपत्राची पाहणी केली असता त्यामध्ये आरोपी यांनी मंडळ अधिकारी देवरी व ग्राम महसुल अधिकारी सा.क्र. 8 देवरी यांचे नावाने तयार केलेले पत्र, उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी देवरी यांचे कार्यालयीन जा.क्र.734/2025 दि.18.12.2025 अन्वये तहसीलदार देवरी यांना देण्यात आलेले पत्र असलेले कागदपत्रांचे छायांकीत प्रती जप्तीपत्रक क्र.2 अन्वये जप्त करण्यात आले व मुळ कागदपत्रे त्यांचे कार्यालयातील कर्मचारी यांचेकडे देण्यात आले.

त्यानंतर आमचे सुचनेवरून पंच क्र 1 यांनी आलोसे संदेश नैनदास बोरकर यांची अंगझडती घेतली. अंगझडतीमध्ये मिळुन आलेले साहीत्य व त्यांच्या पेहरावाबाबत वेगळी विस्तृत अंगझडती यादी तयार करण्यात आली. त्या यादीवर दोन्ही पंच व आम्ही सहया केल्या आहेत. आरोपी यांची अंगझडती यादी मधील साहीत्य परत मिळाल्याबाबत त्यांची सही घेण्यात आली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना आवाज देवुन बोलाविले. अधिनस्त अंमलदार यांनी कक्षतील लाईट बंद करुन प्रकाषाची तिव्रता कमी केली. त्यानंतर तक्रारदार यांचे दोन्ही हात व त्यांचे फुलपँटचा उजवा खिसा अल्ट्राव्हायलेट लॅम्पच्या प्रकाशात दोन्ही पंचासमक्ष तपासले असता त्यांचे उजवे हाताचे बोटाचे टोकावर व तळव्यावर तसेच फुलपॅन्टचे उजवे खिशाचे तोंडावर व आतील भागास अँथॉसीन पावडरची निळसर रंगाची चकाकी दिसून आली. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पंच क्र. 1 यांनी तक्रारदार यांची अंगझडती घेतली. अंगझडती मध्ये मिळुन आलेले सामान व त्यांच्या पेहरावाबाबत वेगळी विस्तृत अंगझडतीची यादी तयार करण्यात आली. अंगझडती यादी मधील सामान चिज वस्तु व पैसे त्यांना परत देवुन परत मिळाल्याबाबत त्यांची सही घेतली. त्या यादीवर आम्ही व दोन्ही पंचांनी सह्या केल्या.

त्यानंतर आम्ही पंच क्र. 1 यांना ते तक्रारदारासह चैरागडे फार्म हाउस भागी ते तहसिल कार्यालय देवरी येथे पोहचुन नियोजित इशारा करेपर्यंत घडलेल्या घटना व झालेले संभाषण याबाबत सविस्तर माहिती सर्वासमक्ष पंच क्र. 2 यांना सांगण्याबाबत निर्देश दिले. त्यावरून पंच क्र. 1 यांनी सांगितलेली हकीकत पुढील प्रमाणे आहे.

"मी तक्रारदार यांचेसोबत त्यांचे मोटारसायकलने भागी येथील चैरागडे फार्म हाउस जवळुन तहसिल कार्यालय देवरी येथे गेलो असता गै. अ. बोरकर हे कार्यालयात बसुन आमची येण्याची वाट पाहत होते. तक्रारदार यांनी बोरकर साहेब नमस्कार खुप घाई गर्दी झाली तिच्यावर ओरडलो असा नाही करावा पाहीजे आता, सोमवारी मला कोणत्याही परिस्थितीत असे म्हटल्यावर गै.अ. यांनी हवना ई ऑफिसमध्ये टाकलेला आहे, आता जशी सही होईल मी डिसपॅच ले जावक करुन ओसी कापी तुम्हाला व्हाटसअप करीन असे म्हटले त्यावर तक्रारदार यांनी तुम्ही मगाषी म्हणल्याप्रमाणे थोडेसे जास्त होत होते म्हणुन मी म्हणलो असे म्हटले तेव्हा गै.अ. यांनी दोन म्हणलो होतो पाचसे कम करुन घ्याल असा म्हणलो होतो त्यानंतर त्याच्यात पुन्हा कामासंबंधी चर्चा होवुन तक्रारदार यांनी ठिक आहे दिड हजार रुपये आहेत असे म्हणुन आपले उजव्या खिशातुन रुपये 1500/- लाच रक्कम काढुन गै.अ.यांना दिल्यावर त्यांनी ठिक आहे असे म्हटले तेव्हा तक्रारदार यांनी त्यांना मोजुन टाका सर असे म्हटले त्यावर गै.अ. यांनी तुम्ही टेंशन कशाला घेता आपला काम प्राम्पट आहे. आपण जर शब्द देलोना भाऊ त्याचा केला समजा असे म्हणुन लाच रक्कम मोजुन आपले फुलपॅटच्या उजव्या खिशात ठेवुन दिले. त्यानंतर पुन्हा त्यांच्यात चर्चा होवुन तक्रारदार यांनी त्यांना चला ठिक आहे थॅक्यु सर असे म्हणुन आम्ही बाहेर आलो तेव्हा आमचे सोबतच गै.अ. हे देखिल बाहेर पोर्चजवळ आले. त्यानंतर तक्रारदार यांनी सापळा पथकास गै.अ. यांनी लाच रक्कम स्वीकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्यानंतर आपण पंच क्र. 2 तसेच सापळा पार्टीतील सर्व सदस्यासह येऊन पुढील कार्यवाही केली." अशी घटनेची हकीकत पंच क्र. 1 यांनी पंच क्र. 2 यांना सर्वासमक्ष सांगितली. यानंतर आम्ही तक्रारदार यांना पंच क्र. 1 यांनी कथन केलेल्या हकीकत बाबत विचारणा केली असता त्यांनी पंच क्र. 1 यांनी सांगितलेली हकिकत बरोबर असल्याचे सांगुन त्यास दुजोरा दिला. याबाबतच्या सविस्तर नोंदी पंचनामामध्ये घेण्यात आले आहेत.

तरी दिनांक 13.02.2026 रोजी तक्रारदार श्री भोजराज शामराव फुंडे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक 13.02.2026 चे 19.12 वा ते 20.04 वा तहसिल कार्यालय देवरी ता. देवरी जि. गोंदिया येथे पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी कार्यवाही व सापळा कारवाई दरम्यान श्री संदेश नैनदास बोरकर वय 39 वर्ष, पद-सहायक महसुल अधिकारी-प्रस्तुतकार 1, वर्ग-3, तहसिल कार्यालय देवरी, ता.देवरी जि.गोंदिया यांनी सर्वे नंबर 309/1/ब ले आउट मध्ये असलेल्या 1189 चैरस खुल्या जागेवर सार्वजनिक गणेश व साई बहुउदेशीय संस्था देवरी यांनी केलेल्या अवैध बांधकामाबाबत मा. उच्च न्यायालय खंडपिठ नागपूर येथे दाखल रिट पिटीशन क्र. 7217/2025 मध्ये मा.न्यायालयाने पारीत केलेल्या आदेशात तक्रारदार यांच्या बाजुने चौकशी अहवाल तयार करुन उपविभागीय देवरी यांना पाठविण्यास व तक्रारदार यांना देण्यासाठी रु. 2000/- लाच रक्कमेची पंचासमक्ष मागणी करुन तडजोडीअंती रु. 1500/- लाच रक्कमेची मागणी करुन ती लाच रक्कम स्विकारुन गैरफायदा घेतला आहे. म्हणुन माझी आरोपी लोकसेवक श्री संदेश नैनदास बोरकर वय 39 वर्ष, पद-सहायक महसुल अधिकारी-

प्रस्तुतकार 1, वर्ग-3, तहसिल कार्यालय देवरी, मुळ पत्ता- मु.पो.ठाणा,ता.आमगाव जि.गोंदिया, सध्याचा पत्ता कैलाश नागरीकर यांचे घरी किरायाने, पंचशिल चौक, विठठल रुखमाई मंदीराचे मागे देवरी ता.देवरी जि.गोंदिया यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनीयम 1988 (सुधारीत अधिनीयम 2018 ) चे कलम 7 प्रमाणे गुन्हा नोंद होणेकरीता कायदेशीर फिर्याद देत आहे.

( उमाकांत उगले )

पोलीस निरीक्षक
लचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

PRAVIN GOVINDRAO DANGE(I (Inspector)) / PNMH54682 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

**Name (**नाव**):** PRAVIN GOVINDRAC

**Rank(**पद**):** I (Inspector)

**No.(**सं.**):** PNMH54682

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| **S.No.(अ.क्र.)** | **Sex (लिंग)** | **Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष)** | **Build (बांधा)** | **Height (cms.) (उंची(सें. मी.))** | **Complexion (रंग)** | **Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा)** |
|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| **Deformities/ Peculiarities** | **Teeth (दात)** | **Hair (केस)** | **Eyes (डोळे)** | **Habit(s) (सवयी)** | **Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी)** |
|---|---|---|---|---|---|
| **8** | **9** | **10** | **11** | **12** | **13** |
| | | | | | |

| **Language /Dialect (भाषा / बोलीभाषा)** | **Place Of (का स्थान)** | | | | | **Others (इतर)** |
|---|---|---|---|---|---|---|
| | **Burn Mark (भाजल्याच्या खुणा)** | **Leucoderma (कोड)** | **Mole (तिळ)** | **Scar (व्रण)** | **Tattoo (गोदण)** | |
| **14** | **15** | **16** | **17** | **18** | **19** | **20** |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**